# राज्यशास्त्र

## भारत आणि जग

### अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | महायुद्धोत्तर राजकीय घडामोडी | ५७ |
| २. | भारताच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल | ६५ |
| ३. | भारताची सुरक्षा व्यवस्था | ७२ |
| ४. | संयुक्त राष्ट्रे | ७७ |
| ५. | भारत व अन्य देश | ८४ |
| ६. | आंतरराष्ट्रीय समस्या | ९१ |


इयत्ता आठवीपर्यंत नागरिकशास्त्र म्हणून शिकवला जाणारा विषय इयत्ता नववीपासून राज्यशास्त्र या नावाने आपण शिकणार आहोत. नागरिकशास्त्राप्रमाणेच राज्यशास्त्रातही आपण आपल्या राजकीय जीवनाचा अभ्यास करणार आहोत. हा अभ्यास आता अधिक व्यापक आणि सखोल होणार आहे. राजकीय जीवनात ज्याप्रमाणे स्थानिक शासन, संविधान, संविधानातील मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे इत्यादींचा समावेश असतो, त्याचप्रमाणे देशाची शासनव्यवस्था, राज्यकारभार, धोरणनिर्मिती, लोकशाही, विविध चळवळी यांचाही समावेश असतो. शासनाचे निर्णय, शासनाची धोरणे, शासनाकडून केला जाणारा सत्तेचा वापर यांचा सामान्य माणसाच्या जीवनावर परिणाम होतो. राज्यशास्त्र या सर्व बाबींचा शास्त्रशुद्ध व चिकित्सक रीतीने अभ्यास करते. राज्यशास्त्राच्या अभ्यासातून तुम्हांला राजकीय घडामोडी, राजकीय प्रवाह आणि प्रक्रिया यांचे अधिक चांगले आकलन होईल. कोणत्याही क्षेत्रात काम करण्यास आणि प्रावीण्य मिळवण्यात या आकलनाचा फायदा होईल.

# क्षमता विधाने

| अ.क्र. | घटक | क्षमता |
|---|---|---|
| १. | १९४५ पासूनचे जग – महत्वाचे प्रवाह | ☐ शस्त्रास्त्र स्पर्धेमुळे आंतरराष्ट्रीय शांततेला धोका निर्माण होतो याची जाणीव होणे.<br>☐ शीतयुद्धोत्तर काळातील जागतिक घडामोडींचे विश्लेषण करता येणे.<br>☐ जागतिकीकरणाला भारताने दिलेल्या प्रतिसादाची माहिती करून घेणे.<br>☐ जागतिकीकरणाच्या संदर्भात विविध देशांचे परस्परावलंबित्व जाणून घेऊन त्याबाबत चर्चा करणे. |
| २. | भारताच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल | ☐ परराष्ट्र धोरणाचा अर्थ सांगता येणे.<br>☐ परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टांबाबत आदर बाळगणे.<br>☐ स्वतंत्र भारताचे परराष्ट्र धोरण विविध घटनांच्या साहाय्याने स्पष्ट करता येणे.<br>☐ भारत आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेस नेहमीच प्राधान्य देतो, ही जाणीव विकसित करणे. |
| ३. | भारताची सुरक्षाव्यवस्था | ☐ भारतातील संरक्षण यंत्रणेचे स्वरूप समजून घेणे.<br>☐ लष्करी व निमलष्करी दलांच्या कार्याचे वर्गीकरण करता येणे.<br>☐ मानवी सुरक्षा ही संकल्पना स्पष्ट करता येणे.<br>☐ अंतर्गत सुरक्षिततेविषयी असणाऱ्या आव्हानांची जाणीव असणे.<br>☐ एखाद्या आव्हानाचा अभ्यास करून त्याची संशोधनपत्रिका तयार करता येणे. |
| ४. | संयुक्त राष्ट्रे | ☐ संयुक्त राष्ट्रे ही एक महत्वाची जागतिक संघटना असल्याचे सांगता येणे.<br>☐ संयुक्त राष्ट्रे शांतता रक्षण करतात हे विशद करणे.<br>☐ सर्व राष्ट्रांच्या विकासासाठी शांतता आवश्यक असते, याची जाणीव विकसित होणे.<br>☐ संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत बदल होण्याविषयीची गरज स्पष्ट करता येणे. |
| ५. | भारत आणि अन्य देश | ☐ भारताचे भौगोलिक स्थान व त्याचा भारताच्या अंतर्गत व परराष्ट्र धोरणावर होणारा परिणाम स्पष्ट करता येणे.<br>☐ शेजारी देशांशी मैत्रीपूर्ण संबंध असावेत हा विचार दृढ होणे.<br>☐ प्रादेशिक सहकार्यासाठी असलेल्या संघटनांविषयी कारणमीमांसा करणे.<br>☐ भारत व अन्य देश यांच्यातील आर्थिक व व्यापारी संबंधांत होत असलेल्या बदलांचा आढावा घेता येणे. |
| ६. | आंतरराष्ट्रीय समस्या | ☐ मानवी हक्क जगातील प्रत्येक माणसाला प्राप्त होतात हा विचार विकसित होणे.<br>☐ भारतीय संविधान व कायदे यांद्वारे मानवी हक्कांचे संरक्षण कसे होते हे जाणून घेणे.<br>☐ पर्यावरण ऱ्हास ही एक जागतिक समस्या आहे ही जाणीव विकसित होणे.<br>☐ निर्वासित म्हणजे कोण हे स्पष्ट करता येणे. |